## ससुन हॉस्पीटल मधून पळून गेलेला आरोपी, २४ तासाच्या आत अटकेत, गुन्हेशाखा युनिट-३ ची कारवाई.

कोंढवा पोलीस ठाणे गु.र.नं २५४/२०१५ भादंविक ३७६ सह पॉसको ॲक्ट मधिल येरवडा मध्यवर्ती कारागृहातील न्यायबंदी आरोपी नामे अक्षय अशोक लोणारे वय २१ वर्ष य़ास उपचार कामी ससुन हॉस्पीटल येथे ॲडमीट केले होते.

दिनांक २०/०५/२०१८ सकाळी ०८.३० वा.चे सुमारास चे नमुद आरोपी हा पोलीसांची नजर चुकवून, हातातील बेडी काढून पळून गेल्याने बंडगार्डन पोलीस ठाणेस गु.र.नं १३०/२०१८ भादंविक २२४ वरिलप्रमाणे गुन्हा दाखल होता.

मा. वरीष्ठांचे मार्गदर्शनाप्रमाणे, आरोपीला पकडण्यासाठी श्री. सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हे शाखा युनिट-३ कडील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे पोलीस हवालदार अनिल घाडगे यांना, नमुद आरोपीत हा ऊरूळी कांचन येथे असल्याची खात्रीशीर माहीती मिळाली. नमुद बातमीची खात्री करणेकरीता अधिकारी व कर्मचारी हे ऊरूळी कांचन येथे गेले असता, आरोपीत हा एका अज्ञात इसमाचे मोटार सायकल वर बसून चालला असल्याचे दिसले. तेंव्हा त्यास पाठलाग करून पकडले आहे.

वरीलकामगिरी गुन्हे शाखचे श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे, पोलीसउप-आयुक्त, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त-१. यांचे मार्गदर्शना खाली युनिट ३ गुन्हे शाखा चे सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री शकुर सय्यद, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस कर्मचारी अनिल घाडगे, शिवानंद स्वामी, संदीप राठोड, महेंद्र पवार, गजानन गाणबोटे, अनिल भोसले, आजिनाथ काळे, महिला पोलीस कल्याणी आगलावे यांनी केली आहे.